Est 2019 - 249

# अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर

## पेसा क्षेत्रातील पद भरतीबाबत सुचना

अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपुर विभागातील अनुसूचित क्षेत्रातील (Pesa) उच्च माध्यमिक शिक्षक सेवक, माध्यमिक शिक्षण सेवक,(मराठी)/(इंग्रजी माध्यम), प्राथमिक शिक्षण सेवक, (मराठी/इंग्रजी माध्यम) या पदाच्या रिक्त जागा भरण्याकरीता डिसेंबर २०१८ मध्ये जाहिरात प्रकाशित करण्यात आलेली होती. तदनंतर दिनांक १६,१७ व २४ फेब्रुवारी २०१९ रोजी सदर पदाची लेखी परिक्षा महाऑनलाईन संस्थेकडून घेण्यात आली आहे. महाऑनलाईन संस्थेकडून वरील पदाच्या प्राप्त झालेल्या यादीनुसार या कार्यालयामार्फत दिनांक ६.६.२०१९ ते ११.६.२०१९ या कालावधीमध्ये उमेदवारांची कागदपत्रे तपासणी केलेली आहे.

त्यानुसार दिनाक २.७.२०१९ ला, या पदाची अंतीम निवड यादी प्रसिध्द करुन मुळ कागदपत्राची तपासणी दिनांक ५.७.२०१९ रोजी करण्यात आली असता, मुळ कागदपत्राच्या तपासणीमध्ये व यापुर्वी सादर केलेल्या दस्तावेजामध्ये तफावत व इतर त्रुटी आढळून आलेल्या आहेत. तेव्हा दिनांक २.७.२०१९ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली अंतिम निवड यादी, विभागीय निवड समितीने घेतलेल्या दिनांक ६.७.२०१९ रोजीच्या निर्णयानुसार रद्य करण्यात येत आहे, तसेच पेसा क्षेत्रातील सर्व शिक्षक सवंर्गातील अंतीम निवड यादी यथावकाश प्रसिध्द करण्यात येईल, यांची संबधितांनी नोंद घ्यावी.

मुळ प्रत मा.अपर आयुक्त व्दारा अनुमोदित

(डी.एम.हेडाऊ)
सहाय्यक आयुक्त, (प्रशासन)
कार्यालय, अपर आयुक्त,
आदिवासी विकास, नागपूर